# कार्यकारी सरांश

**सद्याच्या 10 T प्रवर्तन भट्टीच्या ठिकाणी 15 T प्रवर्तन भट्टी स्थापित करून व एक 1X30 T ची अतिरिक्त प्रवर्तन भट्टी स्थापन करून एम.एस. बिलेटसचे उत्पादन 1,84,500 TPA ते 3,50,000 TPA पर्यंत वाढविण्याचा व रोलिंग मिल द्वारे TMT बार्स चे उत्पादन 72,000 TPA ते 3,50,000 TPA पर्यंत वाढविण्याकरिता प्रस्ताव**

**प्रवर्तक**

## मेसर्स जयदीप मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि.

गट क्र. 73, 74, 76, 78, 79, 80, 179 व 180 गाव : लखमपूर, भिवंडी, वाडा रोड, तालुका : वाडा, जिल्हा : पालघर, महाराष्ट्र


**पोल्यूशन एण्ड इकॉलॉजी कन्ट्रोल सर्विसेस, नागपूर**

Accreditation no.: QCI/NABET/EIA/1720/RA0101

Extension Letter: QCI/NABET/ENV/ACO/21/2133 dated 17th November, 2021

# कार्यकारी सारांश

## प्रस्तावना

मेसर्स जयदीप मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि. यांनी गट क्र. 73, 74, 76, 78, 79, 80, 179 व 180 गाव : लखमपूर, भिवंडी, वाडा रोड, तालुका : वाडा, जिल्हा : पालघर, महाराष्ट्र येथे सद्याच्या 10 T प्रवर्तन भट्टीच्या ठिकाणी 15 T प्रवर्तन भट्टी स्थापित करून व एक 1X30 T ची अतिरिक्त प्रवर्तन भट्टी स्थापन करून एम.एस. बिलेटसचे उत्पादन 1,84,500 TPA ते 3,50,000 TPA पर्यंत वाढविण्याचा व रोलिंग मिल द्वारे TMT बार्स चे उत्पादन 72,000 TPA ते 3,50,000 TPA पर्यंत वाढविण्याकरिता प्रस्ताव केलेला आहे. मेसर्स जयदीप मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि. यांनी गट क्र. व 78 (P) व 79 गाव : लखमपूर, भिवंडी, वाडा रोड, तालुका : वाडा, जिल्हाः पालघर, महाराष्ट्र येथे 15 T प्रवर्तन भट्टी स्थापित करून 1,30,000 TPA वितळलेले स्टिल इन्गोटस व बिलेटस तयार करण्याकरिता पर्यावरणीय स्विकृत पत्र क्र. SEIAAA-EC-0000002125 दिनांक 20 फेब्रुवारी 2020 द्वारे मिळालेली आहे. मेसर्स जयदीप मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि. सन 2009 मध्ये मेसर्स सन मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि. संपादन केले जे गट क्र. 73, 74, 76, 78, 79, 80, 179 व 180 गाव : लखमपूर, भिवंडी, वाडा रोड, तालुका : वाडा, जिल्हा : पालघर, महाराष्ट्र येथे 10 T प्रवर्तन भट्टी द्वारे 54500 T बिलेटसचे व इन्गोटस उत्पादन व 72,000 T TMT बार्सचे रोलिंग मिल द्वारे उत्पादन केले होते. पोल्यूशन एण्ड इकॉलॉजी कन्ट्रोल सर्विसेस, नागपूर ही QCI-NABET मान्यताप्राप्त श्रेणी ‘A’ ची पर्यावरण सल्लागार संस्था आहे, जे प्रस्तावित प्रकल्पामुळे उद्‌भवणाऱ्या प्रभावांमुळे प्रभावित होणाऱ्या विविध पर्यावरणीय घटकांसाठी पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन (EIA) अभ्यास आणि पर्यावरणीय व्यवस्थापन योजना तयार करण्याचे कार्य करित आहेत.

| अनु. क्र | उत्पादने | **IF** आकार (सद्याचा) | **IF** आकार विस्तारिकरणा नंतर | उत्पादन **(TPA)** (सद्याचा) | प्रस्तावित क्षमता **(TPA)** | उत्पादन विस्तारिकरणा नंतर **(TPA)** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बिलेट, इन्गोट्स | 1X10 T | 1X15 T | 1,84,500 | 1,65,500 | 3,50,000 |
| | | 1X15 T | 1X15 T<br>1X30 T | | | |
| | | 1X10 T (Sun metallic) | | | | |
| 3 | TMT बार्स | रोलिंग मिल | - | 72,000 | 2,78, 000 | 3,50,000 |

प्रस्तावित प्रकल्प गट क्र.73, 74, 76, 78, 79, 80, 179 व 180 गाव : लखमपूर, भिवंडी, वाडा रोड, तालुका : वाडा, जिल्हा : पालघर, महाराष्ट्र येथे स्थित आहे. एकूण प्लाट क्षेत्र 5.72 हे. आहे. हे ठिकाण कच्च्या मालाच्या स्त्रोतांच्या मध्यभागी स्थित आहे.

10 कि.मी. त्रिज्याचा स्थलाकृति नकाशा खालील आकृतिमध्ये दिलेला आहे.

**पर्यावरण मांडणीचा तपशील**

| **अनु क्र.** | **विवरण** | **माहिती** |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पाची माहिती | प्रस्तावित प्रकल्प गट क्र.73, 74, 76, 78, 79, 80, 179 व 180 गाव : लखमपूर, भिवंडी, वाडा रोड, तालुका : वाडा, जिल्हा : पालघर, महाराष्ट्र |
| 2 | सह–निर्देशांक | A. 19°35'2.01"N 73° 6'44.84"E<br>B. 19°34'57.15"N 73° 6'42.78"E<br>C. 19°34'57.11"N 73° 6'40.27"E<br>D. 19°34'55.97"N 73° 6'39.99"E<br>E. 19°34'56.26"N 73° 6'37.02"E<br>F. 19°34'58.22"N 73° 6'36.55"E<br>G. 19°34'59.01"N 73° 6'31.61"E<br>H. 19°35'2.65"N 73° 6'30.78"E |
| 3 | स्थलाकृती नं. | 103 MSL |
| 4 | समुद्र सपाटीपासून उंची | 47 E/2, 47 E/3 |
| 5 | सद्याचा भूवापर | औद्योगिक |

| | | |
|---|---|---|
| 6 | जवळचा राष्ट्रीय मार्ग / राजमार्ग | SH – 35 : 10 मी (पू.)<br>SH – 76 : 20 मी (पू.) |
| 7 | जवळचे विमानतळ / हवाई पट्टा | छत्रपती शिवाजी इंटरनॅशनल विमानतळः 57.70 कि.मी. (द.द.प.) |
| 8 | जवळचे रेल्वे स्टेशन | अटगाव : 24.50 रेल्वे स्टेशन कि.मी. (पू.द.पू.) |
| 9 | जवळचे गाव | लखमपूरः 850 m मी (उ.प.) |
| 10 | वने | आरक्षित वन : 550 मी (पू.)<br>आरक्षित वन : 550 मी (उ.प.)<br>आरक्षित वन : 6.7 कि.मी. (द.प.)<br>आरक्षित वन : 4.0 कि.मी. (उ.प.)<br>आरक्षित वन : 4.5 कि.मी. (उ.उ.प.) |
| 11 | इकॉलॉजी संवेदनशील क्षेत्र जसे वन्यजीव अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान व जीवावरण | तानसा वन्यजीव अभयारण्याच्या इको संवेदनशील चा सीमारेषाः 15 कि.मी. उप वनरक्षक, जवाहर वन विभाग, जवाहर जिल्हा पालघर यांच्या पत्रा अनुसार. |
| 12 | जलसाठा | वैतारण नदीः 4.0 कि.मी. (उ.उ.प.)<br>धांडेला नाला : 3.0 कि.मी. (उ.उ.पू.)<br>डोंगरी नाला : 6.5 Km कि.मी. (पू.द.पू.)<br>तनसा नदी : 7.5 कि.मी. (द.द.पू.)<br>मोखाई नाला : 4.5 कि.मी. (प.द.प.)<br>चरणवती नाला : 4.0 कि.मी. (द.पू.) |
| 13 | शाळा | 1) श्री. प्रगत विघ्नेश शाळा : 5.0 कि.मी. (द.पू.)<br>2) झेड.पी. शाळा पाहुनीपाडा : 3.5 कि.मी. (उ.उ.पू )<br>3) नॅशनल इंग्लिश स्कूल : 5.5 कि.मी. (द.द.प.)<br>4) सरकारी शाळा आणि वसतिगृह : 6.5 कि.मी. (द.प.) |
| 14 | रूग्णालय | 1) कल्याणी रूग्णालय खुपरी : 2.0 कि.मी. (द.)<br>2) लक्ष्मी क्लिनिक : 6.0 कि.मी. (द.द.प.)<br>3) ग्रामीण रूग्णालय : 12.5 कि.मी. (उ.प.) |
| 15 | इंडस्ट्रीज | 1) देवगण इंडस्ट्रीज : 2.0 कि.मी. (द.)<br>2) अश्वथी इंडस्ट्रीज लि. : 5.5 कि.मी. (पू.)<br>3) इंडोफॅब इंडस्ट्रीज : 6.5 कि.मी. (प.उ.प.)<br>5) क्रिसिव इंडस्ट्रीज : 5.5 कि.मी. (द.द.पू.)<br>6) विजय केम इंडस्ट्रीज : 6.5 कि.मी. (द.) |

**कच्च्या सामग्रीची आवश्यकता:** प्रकल्पामध्ये सद्याची व प्रस्तावित कच्च्या मालाची आवश्यकता खालील प्रमाणे आहे.

| अनु क्र | कच्चा माल | सद्याची आवश्यकता (TPA) | प्रस्तावित आवश्यकता (TPA) | स्त्रोत | वाहतूकीचे मार्ग |
|---|---|---|---|---|---|
| **रोलिंग मिल** | | | | | |
| 1. | वितळेलेल बिलेट | 74,300 | 2,85,600 | इनहाऊस | - |
| **SMS** | | | | | |
| 1. | स्पॉन्ज आयर्न | 38745 | 34755 | महाराष्ट्र | रस्त्याद्वारे |
| 2. | स्क्रॅप | 148522 | 133227 | मुंबई | रस्त्याद्वारे |
| 3. | फ्लक्स | 2767 | 2482 | मुंबई | |
| 4. | सिलिको मॅग्निज (फेरो) | 2767 | 2482 | मुंबई | रस्त्याद्वारे |

**पाण्याची आवश्यकता**

प्रकल्पाकरिता एकमण 190 KLD आवश्यकता आहे. युनिटच्या या पाण्याची गरज भुजल व खाजगी टँकर RWH पिट द्वारे पूर्ण करण्यात येईल. प्रस्तावित प्रकल्पाकरिता आवश्यक पाण्याची विभागणी खाली दिलेली आहे.

| युनिट | पाण्याची आवश्यकता $m^3$/day | | | एकूण सांडपाणी निर्मिती $m^3$/day | सांडपाण्याची विल्हेवाट |
|---|---|---|---|---|---|
| | सद्याची | प्रस्तावित | एकूण | | |
| शितलीकरण | 80 | 72 | 162 | - | - |
| पिण्यासाठी आणि घरगुती वापर | 10 | 10 | 20 | 16 | निर्मित होणारे अपशिष्ट जल STP मधे प्रक्रियाकृत केले जाईल व वृक्षारोपणाकरिता परत वापर करण्यात येईल. |
| वृक्षारोपण | 10 | 8 | 18 | - | - |
| **एकूण** | **100** | **90** | **190** | - | - |

## विजेची आवश्यकता

विस्तारित प्रकल्पाकरिता एकूण विजेची आवश्यकता 12000 KVA इतकी ओल व ही राज्य विद्युत मंडळा मार्फत प्राप्त केली जाईल.

## संभाव्य रोजगार

प्रस्तावित प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जवळपास 200 लोकांना रोजगार निर्माण होईल.


## तंत्रज्ञान व प्रक्रिया वर्णन

## एम.एस. बिलेटसची उत्पादन प्रक्रिया

प्रवर्तन भट्टी मध्ये स्क्रॅप व स्पॉन्ज आयरन वितळून/थेट आयरन (DRI) कमी करून एम.एस. बिलेटस तयार केले जातात. वितळण प्रक्रिया ही एक बॅच प्रक्रिया आहे आणि प्रत्येक बॅचला "उष्णता" असे संबोधले जाते. एम.एस. स्क्रॅप प्रवर्तन भट्टीमध्ये आणला जातो आणि प्रवर्तनच्या प्रक्रियेद्वारे वितळला जातो. TMT बार्स तयार करण्याकरिता योग्य रासायनिक संरचना राखून ठेवण्याकरिता आवश्यकतेनुसार फेरो अलॉयज सारखे ॲडिटीव्हज कमी प्रमाणात मिळविण्यात येतात.

प्राप्त वितळलेले गरम धातु लॅडलच्या माध्यमाने कन्टीन्यूअस कास्टिंग मशिन (CCM) पर्यंत आणले जाते. मधिल वितळलेले धातु थंड होवून घन स्वरूपात एम.एस. बिलेटस तयार होतात. हायड्रोलिक शेअर्स जे CCM चा एक भाग असतो बिलेटस ला आवश्यक त्या लांबी मध्ये कट करतो.


एम. एस. बिलेटस एक इंटरमिडिएट उत्पादन आहे ज्याचा वापर रोलिंग मिल मध्ये TMT बार्सच्या उत्पादनात केला जातो.




**TMT बार्स**

उष्ण बिलेटस त्यानंतर अनेक रोल्स मधून काढले जातात. रोल्स मधेन काढताना त्याचे भौतिक परिमाण आणि आकार बदलतात आणि शेवटचा आकार फिनिशिंग रोल मध्ये प्राप्त केला जातो.

आवश्यक भौतिक गुणवैशिष्ट्ये प्राप्त मिळविण्याकरिता थर्मेक्स क्वेचिंग यंत्रणेचा वापर करून बिलेटस शेवटच्या रोलमधून काढल्यानंतर क्वेन्च केले जातात. अशा प्रकारे तयार TMT बार्स थंड करण्याकरिता कुलिंग बेडवर टाकले जातात आणि प्रमाणित लांबीमध्ये कापले जातात. कटिंगपासून निर्मित घनकचरा जसे एण्ड कटिंग/मेल्टींग असते आणि हे स्क्रॅप यार्ड मध्ये पाठविण्यात येतात.




## पर्यावरणाचे वर्णन

प्रस्तावित प्रकल्प क्षेत्राच्या 10 किमी त्रिज्येतील आधारभूत पर्यावरण गुणवत्ता 1 नोव्हेंबर 2021 ते 30 जानेवारी 2022 करिता तपासण्यात आली.

## वायु पर्यावरण

परिवेशी वायु गुणवत्ता मोजण्या करिता प्रबळ वायु दिशेवर आधारित 8 ठिकाणांची निवड करण्यात आली, खालील श्रेणित आढळली.

$PM_{10}$ : 39.9- 46.3µg/$m^3$
$PM_{2.5}$ : 19.7-30.2µg/$m^3$
$SO_2$ : 9.2 – 17.8 µg/$m^3$
$NO_x$ : 13.1-22.7 µg/$m^3$

| औद्योगिक क्षेत्र निवासी, ग्रामिण क्षेत्र (CPCB मानक) | $PM_{10}$ | $PM_{2.5}$ | $SO_2$ | NOx |
|---|---|---|---|---|
| | 100 µg/$m^3$ | 60 µg/$m^3$ | 80 µg/$m^3$ | 80 µg/$m^3$ |

$PM_{10}$, $PM_{2.5}$, $SO_2$, व NOx ची तिव्रता राष्ट्रीय परिवेशी गुणवत्ते च्या प्रमाणेच्या आत (NAAQ) आढळली.

## जल पर्यावरण

7 भुपृष्ठजल व 8 भुजलाचे एकुण 15 नमुने गोळा करून विश्लेषण करण्यात आले. पाण्याच्या नमुन्याचे विश्लेषण, पाणी व सांडपाण्याची विश्लेषण पद्धती, अमेरिकन पब्लिक हेल्थ असोशिएशन (APHA) पब्लिकेशनच्या प्रमाणित पध्दतीच्या अनुसार करण्यात आले.

माहितीनुसार असे निदर्शनास आले की भूपृष्ठजल तसेच भुजलनमून्यांची गुणवैशिष्ट्ये पिण्याचे पाणी (BIS 10500-2012) करिता च्या अनुबंधीत प्रमाणात होती.

## ध्वनी प्रदुषण

सर्व आठ ठिकाणी ध्वनीची पातळी राष्ट्रीय परिवेशी ध्वनी पातळी प्रमाणकासाठी पर्यावरण व वन मंत्रालया च्या राजपत्राच्या अधिसुचनेत दिल्या प्रमाणे रहिवासी क्षेत्राकरिता 55.0dB(A) किंवा 75.0dB(A) औद्योगिक क्षेत्राकरिता या प्रमाणाच्या आत आहे .

| क्षेत्र संकेत | क्षेत्राची वर्गवारी | मर्यादा dB(A) Leq मध्ये | |
|---|---|---|---|
| | | दिवसा | रात्री |
| A | औद्योगिक क्षेत्र | 75 | 70 |
| B | व्यापारिक क्षेत्र | 65 | 55 |
| C | रहिवासी क्षेत्र | 55 | 45 |
| D | शांतता झोन** | 50 | 40 |

**शांतता झोन म्हणजे रूग्नालय, शैक्षणिक संस्था व न्यायालयाच्या परिसरा भोवतालील 100 मी पर्यंतचे क्षेत्र या क्षेत्रामध्ये वाहनांचा हॉर्न लाऊड स्पिकर व आतिशबाजी यास प्रतिबंध असतो.

## जमिन पर्यावरण

प्रस्तावित प्रकल्प क्षेत्राच्या सभोवतातील परिसरातील सद्याच्या मृदा अवस्थेतील मातीचे भौतिक–रासायनिक गुणवैशिष्ट्यांचे मुल्यांकन करण्याकरिता अभ्यास क्षेत्रातील निवड केलेल्या स्थळांवर मृदाचे चार नमुने संकलित व विश्लेषीत करण्यात आले.

मुदा नमुन्याचा विश्लेषणाच्या परिणामीक असे दिसून आले की ही जमीन मध्यम सुपीक व सरासरी उत्पादकताक्षम होती. मातीची सुपिकता सुधारण्यासाठी व पिक उत्पादनात वाढ करण्यासाठी अभ्यास क्षेत्रातील मातीला अतिरिक्त खतांची आवश्यकता आहे. एकूणच प्रकल्प परिसरातील मृदा गुणवत्ता मध्यम उत्पादकक्षमतेसह मध्यम सुपिक असल्याचे आढळले.

## संभाव्य आघात व शमन उपाय योजना

## वायु गुणवत्तेवर होणारे प्रभाव

प्रस्तावित विस्तारिकण उपक्रमामध्ये वायु प्रदूषणाच्या स्त्रोतांमुळे वायु गुणवत्तेवर होणारे प्रभावा जाणून घेतले गेले.

EIA अभ्यासामध्ये सद्याच्या पायाभूत तीव्रतेचे निरिक्षण करण्यात आले. वितळण प्रक्रिये दरम्यान प्रवर्तन भट्टी पासून प्रामुख्याने अतिरिक्त उत्सर्जन हाते.

प्रस्तावित प्रकल्पा कार्याच्या परिणामी खालील क्षेत्रापासून वायु उत्सर्जन होईल.

a) कच्चा माल हाताळणी व साठवणूक परिसर

b) प्रवर्तन भट्टी

c) वाहतूक

पर्यावरणीय भूपातळीवरील प्रदूषक तिव्रतेचे अनुमान पुढील उपक्रमांमध्ये प्रासंगिक आहे.

- सभोवतालील पर्यावरणावर प्रकल्पामुळे होणारा प्रभाव
- अभ्यास क्षेत्रामध्ये कमाल भुपातळी वरील तिव्रता

विद्यमान अभ्यास क्षेत्रामध्ये वायु गुणवत्तेवरील अनुमानाकरिता गणितीय प्रतिमान AERMOD वापरण्यात आले.

रहिवाशी क्षेत्राकरिता आधारभूत तिव्रतेवर अध्यारोपित केल्यानंतर प्राप्त झालेली पूर्वानुमान प्रदूषकाची श्रेणी पातळी निर्धारित NAAQ मानकांच्या मर्यादेत राहिल.

स्त्रोत उत्सर्जनाच्या वेळी, चिमनीवरील धुराचे वलय वाढतो जो त्याच्या वेगावर अवलंबून असतो. धुर जितका वाढेल किंवा साठेल, भुपातळी तिव्रता तितकीच (GLC's) कमी होईल. जेव्हा उत्सर्जन वातारणात सोडण्यात येईत ते वातावरणात वाहून जाईल, पसरेल व शेवटी एका ठराविक अंतरावर स्थिरावेल. ज्यामुळे प्रकल्प परिसरात GLC तुलनात्मक कमी होईल.

**शमन उपाययोजना**

- मेसर्स जयदीप मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि. धूळ शोषण प्रणाली पुरवेल जी सामग्री व कच्चा माल हाताळणी मुळे होणाऱ्या फ्युजिटीव उत्सर्जनाला नियंत्रित करेल.
- वायु गुणवत्ता प्राचलांचे नियमित निरिक्षण
- कच्चा माल वाहतूकी दरम्यान धूळ उत्सर्जन होण्यापासून रोखण्याकरिता कच्चा माल वाहतूक करणारी वाहणे ताडपत्रीने आच्छादित केले जातील.
- उत्सर्जनाला निर्धारित मर्यादेत ठेवण्याकरिता क्षेत्रात कार्यरत वाहने योम्यरित्या ठेवण्याचे सुनिश्चित करण्यात येईल
- लोडिंग व अनलोडिंग केंद्रावर, जल फवारणी व्यवस्था करण्यात येईल ज्यामुळे मालाच्या वाहतूकी दरम्यान उत्पन्न धुळीचे प्रमाण कमी करता येईल.
- तयार उत्पादनाला पण त्याच ट्रक द्वारे वाहून नेण्यात येईल ज्याद्वारे कच्चा मालाची वाहतूक केली जाईल.
- एकुण जमिनीच्या 33 टक्के जागेत हरितपट्टा तयार करण्यात येईल.

- वाहतूकीमुळे होणाऱ्या धुळीचे प्रमाण कमी करण्याकरिता सर्व अंतर्गत रस्त्यांचे कॉन्क्रिट/डांबरीकरण करण्यात येईल.
- जेव्हा ही, APCS काम करणार नाही, त्यावेळी कच्च्या मालाची भरण प्रक्रिया थांबविण्यात येईल. ज्यामुळे APCS दुरूस्त होई पर्यंत युनिटमध्ये कोणतेही उत्पादन प्रक्रिया होणार नाही.

**पाण्यावर होणारे प्रभाव**

प्रस्तावित प्रकल्पाकरिता एकूण 190 KLD इतकी पाण्याची आवश्यकता आहे. संयंत्र प्रक्रिये दरम्यान प्रक्रिये पासून सांडपाणी तयार होणार नाही.

**घनकचरा निर्मिती**

| अनु क्र. | घनकचरा | सद्याची मात्रा (TPA) | प्रस्तावित मात्रा (TPA) | एकूण मात्रा (TPA) | विल्हेवाट/वापर |
|---|---|---|---|---|---|
| 1. | स्लॅग | 7380 | 6620 | 14000 | आंतरिक रस्ते सपाट करण्यात तसेच सक्त करण्यात वापरण्यात येईल |
| 2. | टेल कटिंग | 2160 | 8340 | 10500 | कच्ची सामग्री म्हणून प्रवर्तन भट्टी मध्ये वापरण्यात येईल |

**सामाजिक–आर्थिक पर्यावरणावर आघात**

प्रस्तावित प्रकल्पाचे प्रक्रिये दरम्यान लोकसंख्या व सामाजिक–आर्थिक परिस्थितीवर होणारे आघात खालिल प्रमाणे आहेत.

- नैसर्गिक संसाधन जसे पाणी व जमिन यांचे वर प्रतिकुल आघात होऊ शकतो, वायु गुणवत्तेत नगण्य आघात होऊ शकते.
- रोजगाराच्या संधित वाढ व रोजगाराकरिता बाहेर स्थलांतरता घट होईल.

- स्थानिक उत्पादन व सेवा यांच्या ग्राहक किंमती, जमिनीचे मुल्य घरभाडे दर व मजुरी यात वाढ होईल.
- अभ्यास क्षेत्राच्या सामाजिक–आर्थिक पर्यावरणात सुधारणा होईल.
- वाहतुक, संप्रेषण, आरोग्य व शैक्षणिक सुविधेत सुधारणा होईल.
- व्यवसाय, वाणिज्य व सेवा क्षेत्रात वाढ झाल्यामुळे रोजगारात वाढ होईल.
- सामाजिक–आर्थिक पर्यावरणावर एकुण प्रभाव फायदेशिर असतील.

## पर्यावरणीय निरिक्षण कार्यक्रम

मेसर्स जयदीप मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि. च्या प्रस्तावित विस्तारित प्रकल्पामधे प्रस्थापित केलेल्या प्रदूषण नियंत्रण उपकरणांच्या योग्यतेचे मुल्यांकन करण्याकरिता पर्यावरणात्मक निरिक्षण कार्यक्रम महत्वपूर्ण आहे. प्रकल्पा निरिक्षण स्थळांसह पर्यावरणीय घटकांचे नमुना संकलन व विश्लेषण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनानुसार करण्यात येईल.

मेसर्स जयदीप मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि. द्वारे प्रस्तावित प्रकल्प तसेच सभोवतालील क्षेत्रातील प्रदूषणाच्या पातळी मुल्यांकन नियमित आधारे करण्यात येईल. त्यामुळे अभ्यास क्षेत्राच्या पर्यावरणीय प्रदूषकांची माहिती मिळविण्याकरिता पर्यावरणीय निर्देशकांची नियमित निरिक्षण करणे आवश्यक आहे.

## निरिक्षणाचे उद्‌देश्य

- नवीन विकासा सोबत प्रभाव मुल्यमापन अभ्यासाच्या परिणामाचे तपशिलवार पडताळणी करणे
- आढलेल्या प्रमुख प्रदूषकांच्या दिशेने मागोवा घेणे.
- नियंत्रण उपाय योजनांच्या कार्यक्षमतेची तपासणी किंवा मुल्यमापन करणे.

- प्रस्तावित विस्तारित उपक्रमामुळे होणारे आघात मुल्यांकन अभ्यासामध्ये आढळलेले प्रभाव जे काळजी करण्यासारखे नाही त्या व्यतिरिक्त नवीन घटक सुनिश्चित करणे
- नवीन प्रकल्पाकरिता भविष्यातील पर्यावरण मुल्यांकनाकरिता माहिती तयार करून ठेवणे.

गुणविशेष ज्यांचे नियमित परिक्षण आवश्यकता आहे. खाली नमूद केले आहे.

- वायु गुणवत्ता
- पाणी व सांडपाणी गुणवत्ता
- ध्वनी पातळी
- मृदा गुणवत्ता
- इकॉलॉजी संवर्धन व वनीकरण केले आहे
- सामाजिक आर्थिक घटक व सामाजिक विकास

**पर्यावरण व्यवस्थापन योजना**

कंपनी अहवालात नमूद केल्याप्रमाणे विविध शमन उपाय करण्यास बांधिल राहील. पर्यावरण स्वच्छ ठेवण्याकरिता कंपनी एक परिभाषित धोरण ठेवेल.

**वायु पर्यावरण**

वायु प्रदुषणाचे स्त्रोत सामग्री हाताळणी प्रणाली, सामग्री वाहतूक, प्रक्रिया उपकरणांमध्ये कच्चा माल भरणे इत्यादि आहेत. कच्चा माल भरण प्रक्रियेकरिता स्वंयचलित उपकरणे बसविण्यात येतील.

विहित व वैधनिक मानकांद्वारे प्रदूषकांचे उत्सर्जन रोखण्यासाठी आधीच पुरेसे उपाय अवलंबले आहे.

- फ्यूम निर्गमन प्रणालीसह विस्तारिकरण टप्प्यात चिमनी च्या आधी बॅग फिल्टर्स लावण्यात येतील.
- सामग्री अनलोडिंग प्रक्रियेमधून फ्युम्चुटिव उत्सर्जन, सामग्री स्थलांतरण केंद्र संपूर्णपणे आवरणरहित करण्यात येतील.
- राष्ट्रीय परिवेशी वायु गुणवत्ता प्रमाणका सोबत अनुपालनाचे प्रतिवेदन सुनिश्चित करण्याकरिता नियमित आधारावर परिवेशी वायु गुणवत्ता तपासणी करण्यात येईल. कारखान्याच्या परिसरात परिवेशी वायु गुणवत्ता CPCB ने दिलेल्या प्रमाणापेक्षा अधिक राहणार नाही याची खात्री केल्या जाईल. ($PM_{10}$ 100µg/$m^3$, $PM_{2.5}$60µg/$m^3$ $SO_2$ 80µg/$m^3$, NOx 80µg/$m^3$ and CO 04µg/$m^3$)
- चिमनीची नियमित तपासणी केली जाते व विस्तारिकरण टप्प्यादरम्यान त्याच प्रमाणे करण्यात येईल. प्रकल्पापासून होणाऱ्या सर्व उत्सर्जन CPCB/ राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने प्रस्तुत प्रमाणात मिळविण्याकरिता नियंत्रित केल्या जाईल.

## ध्वनी पर्यावरण

सर्व उपकरणांचे नियमित निरिक्षण, ध्वनि उत्पन्न करणाऱ्या युनिटजवळ काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिंना इयर प्लग/मफलर पुरविणे. त्याचबरोबर सर्व खुल्या उपकरणांना आवरण, विभाजनाची योग्य प्रकारे रचना करण्यात येतील.

## जल पर्यावरण

सद्याच्या संयंत्रा पासून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी तयार होणार नाही कारण वापरलेले संपूर्ण पाणी कुलिंग प्रक्रियेमध्ये वापरण्यात येईल. प्रस्तावित विस्तारिकरणानंतरही कोणत्याही प्रक्रारचे सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेतली जाईल..

## घनकचरा व्यवस्थापन योजना

- स्लॅगचा वापर सखल क्षेत्रामध्ये जमीन भरण म्हणून केला जात आहे आणि विस्तारिकरणानंतर ही त्याचप्रमाणे वापरण्यात येईल.
- वंगन केलेले तेल हे अधिकृत विक्रेत्याला देण्यात येईल.

## सामाजिक आर्थिक पर्यावरण

मेसर्स जयदीप मेटॅलिक एण्ड अलॉयज प्रा. लि. क्षेत्राच्या संपूर्ण सामाजिक व आर्थिक विकासात मदत करेल. संयंत्रामध्ये विस्तारिकरणानंतर स्थानिक क्षेत्रातील 200 लोकांना रोजगार देण्यात येईल. प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्प उपक्रमात निर्माण होणारे प्रतिकुल प्रभाव शमविण्या करिता व स्थानिक लोकांमधिल आशंका कमी करण्याकरिता, सुरळित प्रारंभ व प्रकल्प कार्यरत करण्याकरिता प्रभावशाली पर्यावरणीय व्यवस्थापन योजना तयार करणे आवश्यक आहे. त्याकरिता खालील प्रमाणे सुझाव दिलेले आहे.

- प्रकल्पातील अधिकारी व्यक्तिने नियमित स्थानिक लोकांशी संपर्क स्थापित करणे, स्थानिक युवकांना संधि उपलब्ध करून देणे.
- प्रकल्प अधिकाऱ्याने नियमित पर्यावरणात्मक व्यवस्थापनावर पर्यावरणीय जागरूकता कार्यक्रम घेणे.
- रोजगाराच्या संधि महत्वपूर्ण मागणीचा घटक आहे, स्थानिक लोकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार देणे.
- प्रकल्प अधिकाऱ्याद्वारे सामाजिक कल्याण योजना पार पाडण्याकरिता स्थानिक प्रशासन, ग्राम पंचायत, गट विकास कार्यालया द्वारे सहकार्याकरिता समन्वय साधणे.

## हरित पट्टा विकास

वृक्षारोपण क्षेत्रातील सौदर्यं गुणवत्तेत वाढ करण्याव्यतिरिक्त फ्युग्चुटिव्ह उत्सर्जन शोषित करण्यास व ध्वनी क्षीण करण्यास मदत करतात. संयंत्र परिसरात पर्याप्त वृक्षारोपण व हरित पट्टा विकसित करण्यात येईल. एकूण क्षेत्रा पैकी 33 टक्के क्षेत्रात हरित पट्टा विकसित करण्यात येईल .

## निष्कर्ष

प्रस्तावित विस्तारिकरणामुळे बफर झोन मध्ये नगण्य परिणाम होईल असा निष्कर्ष काढला जावू शकतो. प्रकल्प सामाजिक–आर्थिक विकासात, मुलभूत सुविधा जसे वैद्यकिय, शैक्षणिक इत्यादि च्या वाढीसाठी सहभागी होईल. क्षेत्राचा "स्थायी विकास" लक्षात घेवून प्रकल्पाचे संचालन केले जाईल.

त्याचप्रमाणे, प्रकल्प व्यवस्थापक सभोवतालील स्थानिक समुदायाच्या सामाजिक–आर्थिक स्तरामध्ये सुधारणेच्या दिशेने सहभाग देण्यास करारबद्ध आहे.

पर्यावरणीय निरिक्षण हे पर्यावरणाच्या योग्य आणि प्रभावी उपाययोजनांच्या व्यवस्थापनासाठी यशस्वी साधन आहे. हे पर्यावरणीय निरिक्षणांच्या परिणामांच्या आधारे आवश्यक असल्यास मध्यंतरी सुधारणा करण्यास व्यवस्थापकास सहाय्यक ठरेल. समुदायावर वरील प्रचंड सकारात्मक परिणामांचा विचार करता त्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास होईल.